01 JAN 2025
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात ग्रंथ प्रदर्शन सुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी-विद्यार्थिनींसह नागरिकांनी 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत विद्यापीठाच्या ज्ञानस्रोत केंद्रात आयोजित ग्रंथ प्रदर्शन, मोफत वाचन यासह आयोजित विविध उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रामध्ये 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत आयोजित विविध प्रकारच्या ग्रंथांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.



ग्रंथ प्रदर्शनामधील 'अग्निपंख' पुस्तक न्याहाळताना कुलगुरू डॉ. शिर्के.

संचालक डॉ. धनंजय सुतार आणि डॉ. प्रकाश बिलावर यांनी प्रदर्शनात मांडलेल्या ग्रंथांची माहिती दिली. प्रदर्शनात विद्यापीठातर्फे प्रकाशित निवडक २५ ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळातर्फे प्रकाशित १५ ग्रंथ, साहित्य अकादमीकडून प्रकाशित ९० ग्रंथ, तसेच ३५ दुर्मीळ संदर्भ ग्रंथ मांडले आहेत. दुर्मीळ ग्रंथ विभागामध्ये १५३ ग्रंथ मांडले आहेत. यावेळी उद्घाटनप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, ग्रंथालयशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. शिवराज थोरात आदी उपस्थित होते.

01 JAN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘सहकारा’चे अद्ययावतीकरण

## लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्राचे पाऊल

■ संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३१ : संचालक ते सभासदांपर्यंत सर्वांना नवे बदल, तंत्रज्ञानाचे धडे देऊन कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील सहकार क्षेत्राच्या अद्ययावतीकरणाची सुरुवात शिवाजी विद्यापीठाने केली आहे. त्यासाठी गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवित विद्यापीठाने पाऊल टाकले आहे.

विद्यापीठ कार्यक्षेत्रात तिन्ही जिल्ह्यांत सहकारी साखर कारखाने, नागरी सहकारी बँका, पतसंस्था, सूतगिरणी, विविध कार्यकारी संस्था, सोसायटी, दूध संस्था, आदी कार्यन्वित आहेत. त्यांना खासगी क्षेत्राशी स्पर्धा करावी लागत असून, ती दिवसागणिक वाढत आहे.

अशा स्थितीत सहकार क्षेत्रातील मनुष्यबळ विकासासह या संस्थांनी योग्य दिशेकडे वाटचाल करण्यासाठी प्रशिक्षणाच्या माध्यमातून त्यांना बळ देण्यासाठी विद्यापीठाने सन २०२२ मध्ये गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्राची स्थापना केली.

या केंद्राने सहकारी संस्थांच्या व्यवस्थापन विकास कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षणाची सुरुवात केली. त्यात पहिल्यांदा नागरी बँकांच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले. त्यानंतर पुढे संचालक, व्यवस्थापक, मुख्य कार्यकारी अधिकारी, कर्मचारी (लिपिक, चतुर्थश्रेणी), सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविले आहेत.

त्यात सहकार कायद्यातील नव्या बदल, तंत्रज्ञान, डिजिटायझेशन आदींबाबत तज्ज्ञांच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात येत आहे.

### ‘रेडी टू युज’ मनुष्यबळ मिळणार

■ या केंद्राने पी. जी. डिप्लोमा इन बँकिंग अँड फायनान्स सुरू केला आहे. पण, अभ्यासक्रम आणि प्रत्यक्षात कामाची पद्धत यात ‘गॅप’ राहू नये. सहकारी संस्थांना ‘रेडी टू युज’ मनुष्यबळ मिळावे, यासाठी अभ्यासक्रम बदलाचे काम सुरू आहे. त्यासाठी बँका, संस्थांतील सात सीईओंची मदत घेतली जात असल्याचे डॉ. पडवळ यांनी सांगितले.



### आतापर्यंत २३४० जणांना प्रशिक्षण

या केंद्राने आतापर्यंत एकूण २३४० जणांना प्रशिक्षणासह मार्गदर्शन केले आहे. नागरी बँकांमधील ९४० अधिकारी, ८५० कर्मचारी, २५० संचालक, १५० सभासद आणि १५० विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यांना आरबीआय, सहकार क्षेत्रातील अधिकारी, तज्ज्ञ आणि विद्यापीठातील प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले आहे. जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशनसमवेत सामंजस्य करार करून त्याद्वारे विविध उपक्रम राबविले जात आहेत.

> ‘आगामी वर्षात या केंद्रातर्फे विद्यापीठ संलग्नित २९९ महाविद्यालयांतील सुविधांचा वापर करुन तालुका पातळीवर प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जाणार आहेत. सांगली, सातारा जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशनसमवेत सामंजस्य करार करण्यात येणार आहे. मार्केटिंग, लेखाविभाग आणि मनुष्यबळ विकासाच्या अनुषंगाने संशोधन करून सहकारी संस्थांना माहिती देणार आहे. या संस्था, बँकांना त्यांच्या यापुढील वाटचालीच्यादृष्टीने धोरणात्मक नियोजन करण्यासाठी मदत केली जाणार आहे.
>
> - डॉ. राजन पडवळ, संचालक, गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र

01 JAN 2025
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अत्याधुनिक नर्सरीतून जैवविविधता संवर्धन



## शिवाजी विद्यापीठाचा २०२५ मधील नवीन उपक्रम : देशी वानांचे संवर्धन केले जाणार

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात पश्चिम घाटातील दोन हजारपेक्षा जास्त वनस्पती असून त्यामध्ये २५० दुर्मिळ वनस्पतींचा समावेश आहे. असे असले तरी २०२५ मध्ये अत्याधुनिक नर्सरीच्या माध्यमातून दुर्मिळ देशी वानांसह जैवविविधता संवर्धन करण्याचा मानस आहे. सुतार विहिर परिसरात तयार करण्यात येणाऱ्या अत्याधुनिक नर्सरीमध्ये ग्रीन हाऊस, शोभावंत फुले, देशी फुलं, उद्यान शेती, फॉरेस्टसाठी आवश्यक रोपांची निर्मिती केली जाणार आहे. खर्च सव्वाकोटींपेक्षा जास्त खर्च आहे.

शिवाजी विद्यापीठातील उद्यान विभागात पूर्वीपासूनच ४० प्रकारची झाडं आहेत तर गुलाब, जाई-जुई, मोगरा यासह वेलवर्गीय फुलांच्या वेलींनी उद्यान विभाग फुलला आहे. २०२५ मध्ये होणाऱ्या अत्याधुनिक नर्सरीमध्ये पश्चिम घाटातील सर्व औषधी वनस्पती लावण्यात येणार आहेत. त्याची रोपे व बिया तयार करून मापक दरात शेतकऱ्यांसह मागेल त्याला विक्री केली जाईल. सर्व प्रकारची रोप आणि ज्या बिया लवकर उगवून येण्यासाठी आवश्यक यंत्रणा उभारली जाईल. तसेच फांद्यांपासून तयार होणाऱ्या रोपांना कलम करून रोपे तयार केली जाणार आहेत. या नर्सरीमध्ये दोन हजारपेक्षा जास्त वानांची निर्मिती केली जाणार आहे. यामध्ये जास्तीत जास्त देशी झाड, वनस्पती, फळ, फुलांचा समावेश असेल. सध्या बिमोड होत चाललेली देशी झाडांची निर्मिती करून संवर्धन केले जाईल. जैवविविधता संवर्धनात शिवाजी विद्यापीठ पहिल्यापासूनच राज्यात एक नंबर आहे. विद्यापीठ परिसरात झाडे, सरपटणारे प्राणी, पशु

**तरुण भारत**
**विशेष वृत्त**

पक्षी मोठ्या प्रमाणात आहेत. उद्यान विभाग, पिण्याच्या पाण्याची टाकी, छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा परिसर आणि गुलाबाची बाग विविध प्रकारच्या फुलांनी फुलली आहे. पॉलिहाऊस तयार केले जाणार असून, बिया किंवा फांद्या घेवून बियांची निर्मिती करून त्याची विक्री केली जाणार आहे. या वनस्पती निर्मितीसाठी लागणाऱ्या विविध ठिकाणांची नियुक्ती केली आहे. शिवाजी विद्यापीठात १० विहिरी, दोन मोठी तळी अन २४ शेततळी २४ आहेत. त्यामुळे विद्यापीठात स्वतःचा पाणीपुरवठा असल्याने प्रस्तावित नर्सरीला पाणी कमी पडणार नाही, असे विद्यापीठ प्रशासनाचे म्हणने आहे.

**प्रकल्प पथदर्शक ठरेल**

शिवाजी विद्यापीठात देशी वानांची लागवड व्हावी यादृष्टीने विद्यापीठातील हा प्रकल्प पथदर्शक ठरेल. जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी स्थानिक वाणांची उपलब्धता करून दिली जाणार आहे.

**- डॉ. व्ही. एन. शिंदे**
**(कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ)**

### उद्यान विभागाची सर्टीफिकेट कोर्स

शिवाजी विद्यापीठात उद्यान विभागाचा सर्टीफिकेट कोर्स आहे. या कोर्समार्फत गार्डन विभागाला लागणारे पूरक मनुष्यबळ तयार केले जाणार आहे. त्यामुळे अत्याधुनि उद्यान विभाग व्यवस्थित फुलवला जाणार आहे.

### बोटॅनिकल गार्डन

बोटॅनिकल गार्डनमध्ये पश्चिम महाराष्ट्रातील १२०० वनस्पती आहेत. यामध्ये दिवसेंदिवस वाढच होत आहे. या वनस्पती पाहण्यासाठी शालेय सहलींसह राज्यभरातील संशोधक येतात. बोटॅनिकल गार्डनमधील वनस्पतींमध्ये भारतीय वनस्पतींसह परदेशी वनस्पतीही आहेत. वनस्पतीशास्त्र विभागातील शास्त्रज्ञांनी येथील वनस्पतींवर संशोधन करून औषध तयार केली आहेत. यामध्ये वाढत्या कॅन्सरवर सगळ्यात महत्त्वाचे संशोधन करून औषध निर्मिती केली आहे.

### देशी-विदेशी वाणांची लागवड

शेतीसाठी देशी वानांच्या वनस्पतींचा वापर करावा तर गार्डन किंवा घराच्या भोवती विदेशी वनस्पतींचा वापर केला जातो. केशर, हापूस, देशी आंबा, नारळ, साग, चिंच, जांभळ अशा ४० प्रकारच्या वनस्पती व्यतिरिक्त अन्य वनस्पती लावल्या जाणार आहेत.

01 JAN 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वाचन संकल्पांतर्गत आजपासून विविध कार्यक्रम

## शिवाजी विद्यापीठात सामूहिक वाचन, व्याख्यानांचे आयोजन

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३१ : 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहात बुधवारी (ता. १) सकाळी अकरा ते दुपारी एक या कालावधीत वाचन कौशल्य कार्यशाळा आणि पुस्तकाचे सामूहिक वाचन कार्यक्रम होणार आहे.

'वाचन कौशल्य' या विषयावर राजाराम महाविद्यालयाचे प्रा. धनंजय देवळाणकर यांचे विशेष व्याख्यान होणार आहे. त्यानंतर 'श्री शाहूंचे चरित्र (श्रीशाहूचरितम्)' आणि महात्मा गांधी यांच्या 'सत्याचे प्रयोग एवं आत्मकथा' या ग्रंथांचे सामूहिक वाचन होणार आहे. गुरुवारी (ता. २) 'स्थानिक लेखक परिसंवाद व नवसाहित्याची ओळख' या उपक्रमांतर्गत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'अस्पृश्यता निवारणाचे लढे' या विषयावर कॉ. संपत देसाई यांचे व्याख्यान राजर्षी शाहू सभागृहात सकाळी अकरा वाजता होईल.

'लेखक व विद्यार्थी वाचन संवाद' या उपक्रमांतर्गत शुक्रवार (ता. ३) ते मंगळवारी (ता. ७) जानेवारीदरम्यान विद्यापीठातील सर्व अधिविभागांमध्ये स्वतंत्रपणे कार्यक्रम होतील. १६ आणि १७ जानेवारी रोजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभानिमित्त ग्रंथ दिंडी, ग्रंथप्रदर्शन आदी कार्यक्रम बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रातर्फे होणार आहेत. १६ जानेवारी रोजी विविध अधिविभागांमध्ये 'पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा' हा कार्यक्रम होणार असून, यातील सर्वोत्तम प्रथम स्पर्धकाला राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे प्रोत्साहनपर बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JAN 2025
पुढारी

# विद्यापीठात शुक्रवारी एकदिवसीय कार्यशाळा

**कोल्हापूर :** क्रांतिज्योती सवित्रीबाई फुले जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्राच्या वतीने अधिविभागातील महिला प्राध्यापक व अधिकारी यांच्यासाठी 'अभ्यासक्रमातील महिलांविषयक दृष्टिकोन' या विषयावर दि. ३ रोजी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. स्त्री अभ्यास केंद्राच्या सेमिनार हॉलमध्ये सकाळी ११ वाजता कार्यक्रम होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असणार आहेत. कार्यशाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालक प्रा. डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JAN 2025
लोकमत

# विद्यापीठात आज कौशल्य कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहात आज, बुधवारी सकाळी ११ ते १ या कालावधीत वाचन कौशल्य कार्यशाळा आणि पुस्तकाच्या सामूहिक वाचन कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. 'वाचन कौशल्य' या विषयावर राजाराम महाविद्यालयाचे प्रा. धनंजय देवळाणकर यांचे विशेष व्याख्यान होईल. 'श्री शाहूंचे चरित्र (श्रीशाहूचरितम्) आणि महात्मा गांधी यांच्या 'सत्याचे प्रयोग एवं आत्मकथा' या ग्रंथांचे सामूहिक वाचन होणार असल्याची माहिती संचालक डॉ. धनंजय सुतार यांनी दिली. २ जानेवारी रोजी 'स्थानिक लेखक परिसंवाद व नवसाहित्याची ओळख' या उपक्रमांतर्गत 'अस्पृश्यता निवारणाचे लढे' या विषयावर कॉ. संपत देसाई यांचे व्याख्यान राजर्षी शाहू सभागृहात सकाळी ११ ते १ या वेळेत होईल. ३ ते ७ जानेवारीदरम्यान 'लेखक व विद्यार्थी वाचन संवाद' या उपक्रमांतर्गत हा कार्यक्रम सर्व अधिविभागांमध्ये स्वतंत्रपणे आयोजित करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JAN 2025
लोकमत

# 'महिलांविषयक दृष्टिकोन'वर कार्यशाळा

कोल्हापूर : क्रांतिज्योती सवित्रीबाई फुले जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्राच्या वतीने अधिविभागातील महिला प्राध्यापक आणि अधिकारी यांच्यासाठी 'अभ्यासक्रमातील महिलांविषयक दृष्टिकोन'या विषयावर ३ जानेवारी २०२५ रोजी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. हा कार्यक्रम स्त्री अभ्यास केंद्राच्या सेमिनार हॉलमध्ये सकाळी ११:०० वाजता होणार आहे. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. यावेळी उल्लेखनीय योगदान आणि कार्यासाठी महिला प्राध्यापकांचा सत्कार, तसेच केंद्राच्या वतीने 'संवादसेतू' या व्यासपीठाचे उद्घाटनदेखील करण्यात येणार आहे. कार्यशाळेचा लाभ महिला प्राध्यापक, अधिकारी यांनी घ्यावा, असे आवाहन स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालक प्रा.डॉ. नीशा मुडे-पवार यांनी केले.

01 JAN 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# केआयटीला सर्वसाधारण विजेतपद

## विद्यापीठ विभागीय व आंतरविभागीय जलतरण स्पर्धेची सांगता

■ सकाळ वृत्तसेवा

कंदलगाव, ता. ३१ : कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठ विभागीय व आंतरविभागीय जलतरण कोल्हापूर येथील स्पर्धा शाहू कॉलेजच्यावतीने आयोजित केल्या होत्या. दोन्ही स्पर्धांमध्ये केआयटी अभियांत्रिकी (स्वायत्त) महाविद्यालयाने सर्वसाधारण विजेतपद पटकावले. पृथ्वीराज सासणे, इंद्रजीत परमेकर, ओंकार इंगळे, चिन्मय जोशी या विद्यार्थ्यांच्या संघाने यश मिळवले



कंदलगाव : जलतरण स्पर्धेतील विजेत्या केआयटीच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करताना संस्थेचे संचालक डॉ. मोहन वनरोट्टी. सोबत डॉ. उदय भापकर, डॉ. जितेंद्र भाट व विजय रोकडे.

पृथ्वीराज अमर सासणे याने ५०, १००,२०० मी. बॅकस्ट्रोक पहिले स्थान, १०० मी. फ्रीस्टाइल तिसरे स्थान. २०० मी. फ्रीस्टाइल चौथे स्थान. ४ x १०० मी. फ्री स्टाइल रिले पहिला.४ बाय १०० मी.मिडल रिले पहिला. ४ बाय २०० मी.मिडल रिले पहिला क्रमांक मिळविला. इंद्रजित उमेश परमेकरने १०० मी. ब्रेस्ट स्ट्रोक दुसरा, ४ बाय १०० मी. फ्रीस्टाईल रिले पहिला ४ बाय १०० मी. फ्रीस्टाईल रिले पहिला क्रमांक ४ बाय २०० मी. मिडल रिले पहिला. ओंकार मारुती इंगळे याने ४ बाय १०० मी. फ्रीस्टाईल रिले पहिला. ४ बाय १०० मी. मिडल रिले पहिला क्रमांक तर ४ बाय २०० मी. फ्री स्टाईल रिले पहिला, ५० मी.ब्रेस्ट स्ट्रोक दुसरा तर २०० ब्रेस्ट स्ट्रोक प्रकारात दुसरा क्रमांक पटकावला. चिन्मय मिलिंद जोशी याने ४ बाय १०० मी. फ्री स्टाईल रिलेमध्ये पहिला ४ बाय १०० मी. मिडल रिलेत पहिला, ४ बाय २०० मी. फ्री स्टाईल रिले पहिला क्रमांक तर ४०० मी. मध्ये तिसरा क्रमांक मिळविला. संचालक डॉ. मोहन वनरोट्टी यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले. मेकॅनिकल विभागप्रमुख डॉ. उदय भापकर, अधिष्ठाता विद्यार्थी उपक्रम डॉ. जितेंद्र भाट, शारीरिक शिक्षण संचालक विजय रोकडे उपस्थित होते. खेळाडूंना संस्थेचे चेअरमन साजिद हुदली, व्हा. चेअरमन सचिन मेनन, सेक्रेटरी दीपक चौगुले यांचे सहकार्य लाभले.

01 JAN 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# केआयटीला जलतरण स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद

## विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ विभागीय व आंतरविभागीय जलतरण स्पर्धा शाहू कॉलेज, कोल्हापूर यांनी आयोजित केल्या होत्या. सदरच्या दोन्ही स्पर्धेत केआयटी अभियांत्रिकी (स्वायत्त) महाविद्यालयाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले आहे. पृथ्वीराज सासणे, इंद्रजीत परमेकर, ओंकार इंगळे, चिन्मय जोशी या विद्यार्थ्यांच्या संघाने हे घवघवीत यश मिळवले.

स्पर्धेत सहभागी असलेल्या खेळाडूंचे अभिनंदन महाविद्यालयाचे संचालक डॉ. मोहन वनरोट्टी यांनी केले. सोबत मेकॅनिकल विभाग प्रमुख डॉ. उदय भापकर, अधिष्ठाता विद्यार्थी उपक्रम डॉ. जितेंद्र भाट, शारीरिक शिक्षण संचालक विजय रोकडे उपस्थित होते. खेळाडूंना संस्थेचे चेअरमन साजिद हुदली, व्हाईस चेअरमन सचिन मेनन, सेक्रेटरी दीपक चौगुले यांचे सहकार्य व प्रोत्साहन लाभले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विभागीय व आंतरविभागीय जलतरण स्पर्धेतील विजेत्या केआयटीच्या विद्यार्थ्यांबरोबर संस्थेचे संचालक डॉ. मोहन वनरोट्टी, डॉ. उदय भापकर, डॉ. जितेंद्र भाट, विजय रोकडे आदी मान्यवर.

**पृथ्वीराज अमर सासने**

५० , १००, २०० बॅक स्ट्रोक : पहिले स्थान

१०० फ्री स्टाईल : तिसरे स्थान

२०० फ्री स्टाईल:– चौथे स्थान

४ x १०० फ्री स्टाईल रिले :– पहिला

४ x १०० मिडले रिले :– पहिला

४ x २०० मिडले रिले :– पहिला

**इंगळे ओंकार मारुती**

४ x १०० फ्री स्टाईल रिले :– पहिला

४ x १०० मिडले रिले :– पहिला

४ x २०० फ्री स्टाईल रिले :– पहिला

५० ब्रेस्ट स्ट्रोक :– दुसरा

२०० ब्रेस्ट स्ट्रोक :– दुसरा

**इंद्रजीत उमेश परमेकर**

१०० ब्रेस्ट स्ट्रोक:– दुसरे स्थान

४ x १०० फ्री स्टाईल रिले :– पहिला

४ x१०० फ्री स्टाईल रिले :– पहिला

४ x२०० मिडले रिले :– पहिला

**चिन्मय मिलिंद जोशी**

४ x १०० फ्री स्टाईल रिले :– पहिला

४ x १०० मिडले रिले :– पहिला

४ x २०० फ्री स्टाईल रिले :– पहिला

४०० वैयक्तिक मिडले :–तिसरा

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JAN 2025
तरुण भारत

# तेरसवाडीची साक्षी पाटील शिवाजी विद्यापीठ क्रिकेट संघात



कोलोली : बी .ए स्पोर्ट क्रीडा अधिविभाग शिवाजी विद्यापीठा ची खेळाडू कु. साक्षी सुहास पाटील हिची पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली.